RNI Regd No. 1814/57 | REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | एक चळवळ | वर्ष-९३, अंक-३००, पाने-१६, किंमत:₹४

web: http://navakal.org | मुंबई, रविवार ३ जानेवारी २०१६ | Email-navakal.1923@gmail.com

# महानगर विकास परिषदेचा अभिप्राय राज्याला वाहन संख्या धोरणाची आवश्यकता

■मुंबई

राज्यात दीड लाख कोटींचे तसेच मुंबईसाठी सागरी रस्ते प्रकल्पाला केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंजुरी दिल्याने महाराष्ट्राच्या विकासाला नवा आयाम प्राप्त होणार आहे. भविष्यात रस्ते विकासाचा समतोल साधण्याकरिता वाहन संख्या धोरण म्हणजेच व्हेईकल पॉप्युलेशन पॉलिसीचाही विचार करणे क्रमप्राप्त असल्याचा अभिप्राय महाराष्ट्र विकास परिषदेने व्यक्त केला आहे. राज्यातल्या महानगरांचा विकास आणि त्याच्या अनुषंगिक विषयांचा अभ्यास तसेच मागोवा घेण्याचे कार्य महानगर विकास परिषद करीत असते.

राज्याच्या पायाभूत सुविधांचा विचार करताना आधुनिक आणि सुसज्ज रस्त्यांना प्राधान्य द्यावे लागेल. नितीन गडकरी यांनी नव्या वर्षात या नव्या पर्वाला प्रारंभ केल्याबद्दल परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ वास्तुशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी आभार मानले. अलिकडेच नॅशनल ट्रान्सपोर्टेशन प्लॅनिंग अँड रिसर्च सेंटरने अँड रिसर्च सेंटरने रस्ते विकासापुढे सगळ्या देशाच्याच विकासाला नवी गती प्राप्त होऊ शकते. अशा प्रकारच्या अभिप्राय व्यक्त केला होता. ११ जानेवारी ते १७ जानेवारी दरम्यान पाळल्या जाणाऱ्या रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त महानगर विकास परिषदेतर्फे व्हेईकल पॉप्युलेशन पॉलिसी संदर्भात संक्षिप्त अहवाल जाहीर केला जाणार आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे प्रकल्पामुळे महाराष्ट्राला झालेले लाभ सर्वांना परिचित असून आता ग्रामीण महाराष्ट्रदेखील विकासयुक्त आणि अपघातमुक्त होण्याला मोठी मदत होईल, असे देशमुख यांनी यावेळी सांगितले.

मुंबईलक्ष्मी
राजा शनिवार
विकली लॉटरी निकाल
सोडत क्र. 19
सोडत दिनांक: 02/01/16
सायं. 5:00 वा.
0680
रु. 10 हजारांची 10 बक्षिसे जिंकली